IO

# FIRST INFORMATION REPORT
# पहिली खबर

Form : 1-A

(Under Section 154 Cr.P.C.)
(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)

No.

1. *Dist. ठाणे *P.S. कोपरी *Year 2019 *FIR No. I 116/2019 *Date 19/12/2019
जिल्हा पोलीस ठाणे वर्ष पहिली खबर क्र. तारीख

2. (i) *Act: भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन 1988 सुधारित 2018 चे *Sections 7 अन्वये
अधिनियम कलमे

(ii) *Act: ........ *Sections ........
अधिनियम कलमे

(iii) *Act: ........ *Sections ........
अधिनियम कलमे

(iv) *Other Acts & Sections : ........
इतर अधिनियम व कलमे

3. (a) Occurance of Offence : *Day 18/12/2019 *Date From ........ *Date To ........
अपराधाची घटना वार तारीख पासून पर्यंत
*Time Period ........ *Time From ........ *Time To 15:41 वा
वेळेचा अवधी पासून पर्यंत

(b) Information received at P.S. Date : 19/12/2019 *Time 02:44 वा
पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख वेळ

(c) General Diary Reference Entry No(s) 8 *Time 02:44 वा
सर्व साधारण रोजनिशीचा संदर्भ क्र. वेळ

4. Type of Information : ........ *Written / Oral लेखी
माहितीचा प्रकार लेखी/तोंडी

5. Place of Occurance : (a) *Direction and Distance from P.S ........ Beat No. ........
घटनेचे ठिकाण पोलीस ठाणे पासून दिशा व अंतर गस्तक्षेत्र क्र.

(b) *Address शॉप नं 7 गौरव अजंठा को ऑप हौ सो. ना ठाणे पूर्व
पत्ता

(c) In case outside limit of this Police Station, then the
या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नांव
Name of P.S ........ Dist. : ........
पोलीस ठाणे जिल्हा

6. Complainant / Informant : ........
तक्रारदार / खबरी

(a) Name : श्री. श्याम कृष्णनाथ पांडे
नांव

(b) Father's / Husband's Name : कृष्णनाथ पांडे
पित्याचे/पतीचे नांव

(c) Date / Year of Birth : 36 वर्षे (d) Nationality : भारतीय
जन्म तारीख / वर्ष राष्ट्रीयत्व

(e) Passport No. : ........ Date of Issue : ........ Place of Issue : ........
पारपत्र क्र. दिल्याची तारीख दिल्याचे ठिकाण

(f) Occupation : रियल इस्टेट ब्रोकर
व्यवसाय

(g) Address : रूम नं 401 भास्कर टॉवर, सांजको टॉवरच्या समोर कोपरी गाव, कोपरी ठाणे पूर्व
पत्ता

**फिर्याद** दिनांक : १९/१२/२०१९

मी, श्याम कृष्णनाथ पांडे, वय ३६ वर्षे, व्यवसाय – रियल इस्टेट ब्रोकर, रा. रुम नं. ४०१, भास्कर टॉवर, जानकी टॉवरच्या समोर, कोपरी गाव, ठाणे (पूर्व) फिर्याद लिहून देतो की,

माझे वडील श्री. कृष्णनाथ श्रीराम पांडे यांच्या नावे शॉप नं. ७, गौरव आनंद को.ऑप.हौ. सोसायटी, शिवराज हॉटेल – वैभव व्हीलेज हॉटेल लेन, पूर्व द्रुतगती मार्ग, आनंद नगर चेकनाका, कोपरी, ठाणे (पूर्व) येथे गाळा आहे. सदर गाळयात सन २००३ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत यांच्याकडून विज जोडणी घेतली होती. सदर गाळयाचा वापर होत नसल्याने सन २००७ मध्ये सदर विज जोडणी बंद करून त्याचे सर्व बिलाची रक्कम अदा करण्यात आली होती.

सदर गाळा आम्हाला आता पुन्हा भाडे तत्वावर दयायचा असल्याने नवीन विज जोडणी मिळण्याकरीता माझ्या वडीलांनी त्यांच्या नावे दि. १९/०६/२०१९ रोजी म.रा.वि.वि.कं.मर्या. कोपरी सब डिव्हीजन या कार्यालयात अर्ज दिला होता. बरेच दिवस होवून देखील नवीन मिटर जोडणी न झाल्याने मी त्याबाबत चौकशी करण्याकरीता कोपरी सब डिव्हीजन कार्यालयात गेलो होतो. त्यावेळी सदर अर्जाच्या अनुषंगाने मी त्या कार्यालयातील सहाय्यक अभियंता श्री. शेडगे यांची भेट घेतली होती. त्यांनी मला माझी जुनी थकबाकी व चोरून विज वापर या बद्दल रूपये १२,०००/– दयावे लागतील असे सांगितले. मी त्यांना जुन्या मिटरची कोणतीही थकबाकी नसल्याचे सांगून गाळयामध्ये कोणतीही अनाधिकृत विज जोडणी घेतलेली नसल्याचे देखील सांगितले. तरी देखील श्री. शेडगे यांनी रूपये १२,०००/– दिले नाही तर नवीन मिटर जोडणी मिळणार नाही असे सांगितले. श्री. शेडगे सांगत असलेली रक्कम ही शासकीय फी अथवा दंडाची रक्कम असल्याचे मला वाटले. त्यामुळे मी त्यांना सदर रक्कम भरणा करण्याचे कबुल करून नवीन मिटर लावण्याबाबत विनंती केली. त्याप्रमाणे श्री. शेडगे हे दि. १४/११/२०१९ रोजी आमच्या गाळयाच्या ठिकाणी आले होते. त्यावेळी त्यांनी मला रूपये १२,०००/– रक्कम त्यांच्याकडे देण्यास सांगितले. त्यानुसार मी त्यांना रूपये १२,०००/– रक्कम दिली. त्याबाबत मी श्री. शेडगे यांना पावतीची विचारणा केली असता त्यांनी मला नंतर बघू असे सांगून थोडयाच दिवसांत नवीन मिटर जोडणी मिळेल असे सांगितले.

परंतु, बरेच दिवस होवून देखील आमच्या गाळयामध्ये नवीन मिटर जोडणी झाली नाही. त्यानंतर दि. ०७/१२/२०१९ रोजी माझी श्री. शेडगे यांच्याशी माझ्या गाळयाच्या ठिकाणी भेट झाली. त्यावेळी मी त्यांच्याकडे माझ्या नवीन मिटरबाबत विचारणा केली असता त्यांनी मला नवीन मिटर करीता आणखीन पैसे दयावे लागतील असे सांगितले. त्यानुसार मी त्यांना आणखीन किती रक्कम दयावी लागेल याबाबत विचारणा केली असता त्यांनी मला आणखीन ८,०००/– रूपये दयावे लागतील असे सांगतले. त्यावेळी मी त्यांना मागे दिलेल्या १२,०००/– रूपयांच्या पावतीबाबत विचारणा केली. त्यांनी मला सांगितले की, सदरची रक्कम ही शासकीय फी नसून ती त्यांची फी आहे. यावरून माझ्या लक्षात आले की, श्री. शेडगे यांनी गाळयातील नवीन मिटर जोडणीकरीता पूर्वी स्विकारलेले रूपये १२,०००/– रक्कम व आता ते मागणी करीत असलेली रूपये ८,०००/– रक्कम ही लाच म्हणून मागणी करीत आहेत. सदरची रक्कम मी त्यांना दिली नाही तर ते आमच्या गाळयात विजेचा नवीन मिटर लावून देणार नाहीत. परंतु, सहाय्यक अभियंता, श्री. सचिन विश्वनाथ शेडगे, कोपरी उपविभाग, म.रा.वि.वि.कं.मर्या ठाणे पूर्व यांना मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी त्यांच्या विरूद्ध कारवाई होण्याकरीता दि. ११/१२/२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात समक्ष हजर राहून पोलीस उप अधीक्षक श्रीमती कुलकर्णी यांच्याकडे तोंडी तक्रार दिली होती.

Form : 1-B

7. Details of known / suspected / unknwon accused with full particulars :
माहित असलेल्या / संशयीत / माहित नसलेल्या आरोपींचा संपूर्ण तपशील :
(Attach separate sheet if necessary)
आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा

No.

सचिन विश्वनाथ शेडगे, वय-५१ वर्षे सहाय्यक अभियंता कोपरी
उपविभाग कोपरी सेक्शन-१ म.रा.वि.वि.क ठाणे पुर्व, ३१६-म्हाडा
कॉलनी प्लॉट नं. १ २०नं A/15 महात्मा फुले नगर ठाणे

Physical features, deformities and other details of the suspect :
संशयीतांची शारीरीक ठेवण, व्यंग आणि इतर तपशील :

| *Sex<br>लिंग | *Date/Year of Birth<br>जन्मतारीख/वर्ष | *Build<br>बांधा | *Height in Cms.<br>उंची (सें.मी. मध्ये) | *Complexion<br>वर्ण | *Identification Mark(s)<br>ओळख |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | - | - |

| *Deformities/Peculiarities<br>व्यंग/वैशिष्ठ्ये | *Teeth<br>दात | *Hair<br>केस | *Eye<br>डोळे | *Habit(s)<br>सवयी | *Dress Habits<br>पोशाखाच्या सवयी |
|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | - | - | - | - | - |

| *Languages /Dialect<br>भाषा / बोली भाषा | PLACE OF | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | *Burn Mark<br>भाजल्याची खूण | *Leucoderma<br>कोड | *Mole<br>तीळ | *Scar<br>व्रण | *Tattoo<br>गोंदण |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| - | - | - | - | - | - |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect. This will be used only for the purpose of preliminary retrieval to assist I.O.
जर तक्रारदार/खबरीने संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावी. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी.

A database created will subsequently link one suspect in several cases, if any.
या अनुषंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीताचा इतर गुन्ह्यांतील सहभाग स्पष्ट करेल.

A comprehensive and complete data on all fields will again be prepared when any accused is arrested irrespective of previous suspicion.
वरील रकान्यातील संपूर्ण माहिती ज्यावेळी संशयीतास अटक करण्यात येईल त्यावेळी पुन:श्च तयार करावी.

माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता सह जिल्हा निबंधक वर्ग – १, ठाणे ग्रामीण येथून दोन शासकीय पंच साक्षीदारांना पाचारण करण्यात आले. पंचांच्या उपस्थितीत सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करुन मला दि. १२/१२/२०१९ रोजी लोकसेवक शेडगे यांची समक्ष भेट घेण्याकरीता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर देवून पंच श्री. केकाण यांच्या समवेत कोपरी उपविभाग, म.रा.वि.वि.कं.मर्या. ठाणे (पूर्व) कार्यालयात पाठविण्यात आले. कार्यालयाच्या गेटवर माझी व लोकसेवक श्री. शेडगे यांची भेट झाली. त्यावेळी लोकसेवक श्री. सचिन शेडगे यांनी माझ्याकडे नविन मिटर देण्याकरीता यापुर्वी रु. १२,०००/– रक्कम स्विकारल्याचे मान्य करुन उर्वरीत रु. ८,०००/– रक्कमेची मागणी केली. तसेच गाळयासाठी विजेचा नविन मिटर जोडून देण्याकरीता श्री. ईश्वर नावाची व्यक्ती येणार असल्याचे सांगून रु. ८,०००/– रक्कम श्री. ईश्वर यांच्याकडे देण्यास सांगितले. सदर पडताळणीवरुन लोकसेवक सचिन शेडगे यांनी आमच्या गाळयामध्ये विजेचा नविन मिटर जोडून देण्याकरीता रुपये ८,०००/– लाचेची मागणी करून सदर रक्कम श्री. ईश्वर नावाच्या व्यक्ती मार्फत स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

चार पाच दिवस होवून देखील लोकसेवक शेडगे यांनी नविन विद्युत मिटरची जोडणी करुन न दिल्याने मी लोकसेवक शेडगे यांच्या मोबाईलवर दि. १७/१२/२०१९ रोजी संपर्क साधला असता लोकसेवक शेडगे यांनी मला दि. १८/१२/२०१९ रोजी कार्यालयात येण्यास सांगितले.

दि. १८/१२/२०१९ रोजी लोकसेवक शेडगे हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित आहेत का? याबाबत खात्री करण्याकरीता माझ्याकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर देवून पंच श्री. केकाण यांच्या समवेत कोपरी उपविभाग, म.रा.वि.वि.कं. मर्या. ठाणे (पूर्व) या कार्यालयात पाठविण्यात आले. सदर कार्यालयाच्या गेटवर माझी लोकसेवक शेडगे यांच्याशी भेट झाली. त्यावेळी त्यांनी माझ्याकडे रू. ८,०००/– रक्कमेची मागणी केली. परंतु, तेव्हा माझ्या जवळ रक्कम नसल्याचे सांगितल्यावर त्यांनी मला रक्कम देण्याकरीता तयार असल्यास ते दुकानाच्या गाळयावर येतील असे सांगितले. त्यानुसार मी त्यांना दुकानाच्या गाळयावर जावून थांबतो असे सांगितले.

त्यानुसार लोकसेवक शेडगे यांच्या विरूद्ध आमच्या दुकान गाळयामध्ये लाचेचा सापळा आजमाविण्याचा निर्णय पो.उप.अधी. श्रीमती कुलकर्णी यांनी घेतला. लोकसेवक शेडगे यांना त्यांच्या मागणीप्रमाणे लाचेची रक्कम रुपये ८,०००/– देण्याकरीता मी शॉप नं. ७, गौरव आनंद को.ऑप. हौ. सोसायटी, ठाणे पूर्व येथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच श्री. केकाण यांच्यासह थांबून राहिलो.

दि. १८/१२/२०१९ रोजी लोकसेवक शेडगे यांनी गौरव आनंद को.ऑप.हौ. सोसायटी मधील शॉप नं. ७ मध्ये माझ्याकडून रूपये ८,०००/– लाचेची रक्कम पंच श्री. केकाण यांच्या समक्ष स्विकारल्यानंतर लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत पुर्वनियोजित ईशारा केल्यानंतर सापळा पथकाने लोकसेवक शेडगे यांना १५:४१ वाजता रंगेहात पकडले.

लोकसेवक शेडगे यांच्याकडून लाचेची रक्कम त्यांनी परिधान केलेल्या पॅन्टच्या पुढील बाजूच्या डाव्या खिशामधून हस्तगत करण्यात आली. त्यातील नोटांचे क्रमांक पडताळले असता ते सापळापूर्व पंचनाम्यामध्ये नोंदविलेल्या क्रमांकांशी जुळून आले. अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या प्रकाशात केलेल्या तपासणीमध्ये हस्तगत केलेल्या लाचेच्या नोटांवर, लोकसेवक शेडगे यांच्या दोन्ही हातावर, बोटांवर व परिधान केलेल्या पॅन्टच्या पुढील बाजूच्या डाव्या खिशाच्या आतील व बाहेरील बाजूच्या कडांवर अॅन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म आढळून आले आहेत.

Form : 1-C

**No.**

8. Reasons for delay in reporting by the Complainant / Informant :
तक्रारदाराने / खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे :
..............................................................................................................................
..............................................................................................................................
..............................................................................................................................

9. Particulars of properties stolen /involved (Attach separate sheet if necessary) :
चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) :
..............................................................................................................................
..............................................................................................................................
..............................................................................................................................

10. *Total value of properties stolen / involved :..........................................................
चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य :

11. *Inquest Report / U.D. Case No., if any :..........................................................
मरणान्वेषण अहवाल/यु.डी. प्रकरण क्र., जर असल्यास :

12. F.I.R. Contents (Attach separate sheets, if required) :
पहिल्या खबरीतील हकिकत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावेत) :
मा.म. वेळी व जागी यातील लोकसेवक यांनी लोकसेवक या नात्याने त्यांना मिळालेल्या
अधिकाराचा वापर/ दुरुपयोग करून फिर्यादी यांच्या मालकीच्या गौरव आनंद को.ऑप.हौ.सोसा
मध्ये शॉप नं 7 मधील विजेचा नवीन मिटरची जोडणी करून देण्याकरिता दि.11/12/2019 रोजी
4000/- रु लाचेची मागणी करून स्वतः स्वीकारून दि. 18/12/2019 रोजी 15:40 वा वरील
ठिकाणी फिर्यादीकडून स्वीकारली म्हणून फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने त्यांच्या विरुद्ध
तक्रार

13. Action taken : Since the above report reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2., registered the case and took up the investigation/directed*..........................................................Rank..........................................to take up the investigation/Refused investigation/transferred to P.S..........................................on point of jurisdiction.
केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरून दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले मा. निलीमा कुलकर्णी [illegible]........ पदनाम.....................................यांना तपासाचे काम हाती घेण्याचा निर्देश दिला/तपास करण्याचे नाकारले/अधिकारितेच्या मुद्यावर... CACB ठाणे ..........................पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/Informant free of cost.
पहिली खबर तक्रारदाराला/ खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदवली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला / खबरीला प्रत मोफत दिली.

ASI.

Signature of the Office-in-charge, Police Station
पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सह

*Name : जी. पी. कोळी
नांव

*Rank : ASI ........ *No. : ..................
पदनाम क्रमांक

14. Signature/Thumb impression of the Complainant/Informant.
तक्रारदाराची / खबरीची सही/अंगठ्याचा ठसा

15. Date & Time of despatch to the court :..........................................................
कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ

अशा प्रकारे लोकसेवक सचिन विश्वनाथ शेडगे, वय ४१ वर्षे, सहाय्यक अभियंता, कोपरी उपविभाग, कोपरी सेक्शन १, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, ठाणे (पूर्व). रा. म्हाडा कॉलनी, फ्लॉट नं. १, रुम नं. ए – १५, महात्मा फुले नगर, ठाणे (प.) यांनी लोकसेवक या नात्याने त्यांना मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करुन माझ्या वडीलांच्या मालकीच्या गौरव आनंद को. ऑप. हौ. सोसायटी मधील शॉप नं. ७ मध्ये विजेच्या नवीन मिटरची जोडणी करुन देण्याकरीता दि. १२/१२/२०१९ रोजी रु. ८,०००/– लाचेची मागणी करुन सदर रक्कम दि. १८/१२/२०१९ रोजी १५.४१ वा. गौरव आनंद को.ऑप.हौ. सोसायटीमधील शॉप नं. ७ मध्ये माझ्याकडून स्विकारली म्हणून माझी लोकसेवक सचिन विश्वनाथ शेडगे, सहाय्यक अभियंता, कोपरी उपविभाग, कोपरी सेक्शन – १, म.रा.वि.वि.कं.मर्या. ठाणे पूर्व यांच्या विरुध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे.

समक्ष

निलिमा कुलकर्णी
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

( श्याम कृष्णानाथ पांडे )